# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक २१ वा बुधवार दि.१९ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत लोदगा येथे मिलेटची पेरणी; मिलेटपासून बनलेल्या पदार्थांचाही घेतला आस्वाद

## राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचा पुढाकार

लातूर : – मिलेट अर्थात पौष्टिक तृणधान्यांचा आहारातील समावेश हा आरोग्यासाठी हितकारक असून मिलेटचे उत्पन्न वाढविण्यासाठी जिल्ह्यात कृषि विभागाने प्रयत्न सुरु केले आहेत. राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात २०० हेक्टरवर मिलेट पेरणीचे नियोजन करण्यात आले असून श्री. पटेल आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते लोदगा येथून मिलेट पेरणीला सुरुवात करण्यात आली. तसेच बचत गटांच्या महिलांनी मिलेटपासून तयार केलेल्या पदार्थांचाही यावेळी त्यांनी आस्वाद घेतला. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, औसा– रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार भारत सूर्यवंशी, उपविभागीय कृषि अधिकारी दिलीप जाधव, डॉ. शेषेराव मोहिते यांच्यासह मिलेट पेरणी करणारे शेतकरी यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांना बांबूपासून बनविले पेन, टूथब्रश आणि टॉवेल देवून सत्कार करण्यात आला. लातूर, औसा आणि निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांनी मिलेट पेरणीसाठी सहमती दर्शविली आहे. आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आहारात तृणधान्याचा समावेश करणे आवश्यक आहे. तृणधान्यात कॅल्शिअम, लोह आणि प्रथिने याचे उच्च प्रमाण असून कमी ग्लायसेमिक इंडेक्स, मुख्य आहाराच्या तुलनेत जास्त फायबरचा समावेश आहे. तृणधान्याचे महत्व पटवून



देण्यासोबतच जिल्ह्यात मिलेट लागवडीला प्रोत्साहन देण्यासोबतच उत्पादित झालेल्या मिलेटला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच शेतकऱ्यांना मिलेटचे चांगल्या प्रतीचे बियाणे लोदगा येथील फिनिक्स फौंडेशनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. मिलेट पिकांसाठी कमी पाणी लागते, तसेच ८० ते ९० दिवसांत ही पिके घेतली जातात. लातूर जिल्ह्यातील पर्जन्यमानाचा विचार करता जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मिलेट लागवड फायदेशीर ठरणार असल्याचे कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले. मिलेटचा आहारातील समावेश ही काळाची गरज असून मिलेट हे आरोग्यासाठी हितकारक असल्याचे सिद्ध झाले आहे. ज्वारी, बाजरी, भगर, राजगिरा, राळे आदी मिलेटची पेरणी जिल्ह्यात जास्तीत जास्त क्षेत्रावर होण्यासाठी कृषि विभागाने प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर– घुगे यांनी सांगितले. तसेच मिलेटपासून तयार करण्यात आलेले पदार्थ आरोग्यदायी असल्याने बचतगटांच्या माध्यमातून अशा पदार्थांची विक्री वाढविण्यासाठी जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ आणि कृषि विभागामार्फत प्रयत्न करण्याबाबत सूचना देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

पोषणाच्या दृष्टीने मिलेट आहे फायदेशीर

मिलेट पोषणाच्या दृष्टिकोनातून भातापेक्षा अधिक फायदेशीर आहे. त्यामध्ये अधिक कॅलोरी, प्रथिने, चरबी, कार्बोहायड्रेट, फायबर, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस आणि थायमिन (बी१) असतात. त्यामुळे, मिलेटचा समावेश आहारात केल्यास अनेक पोषणतत्त्वे अधिक प्रमाणात मिळू शकतात, ज्यामुळे एकंदरीत आरोग्य चांगले राहण्यास मदत होऊ शकते.

मिलेटचे असे आहे पोषणमूल्य

ज्वारी : रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते. रक्ताभिसरण वाढवते. ज्वारी वजन कमी करण्यास मदत करते. हाडांच्या आरोग्यासाठी ज्वारी उपयुक्त ठरते. शरीरातील ऊर्जा पातळी सुधारते. तसेच ह्रदयाचे आरोग्यही ज्वारीमुळे सुधारते. बाजरी : बाजरीमध्ये कॅल्शियम, विटामिन ए, बी व फॉस्फरस, लोह, मँगेनीज अधिक मात्रेत उपलब्ध असते. रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित, रक्तदाबावर नियंत्रण, हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी व नेमिया आजारावर मात करण्यासाठी बाजरी उपयुक्त आहे. नाचणी : शक्तीवर्धक, पित्तशामक असल्याने नाचणी रक्त शुद्ध करण्यास उपयुक्त आहे. कॅल्शियम आणि लोह मुबलक असल्याने गरोदर माता व वयोवृद्ध व्यक्तींना हाडांसाठी व निमियावर नाचणीचे पदार्थ उपयोगी ठरतात. नाचणीमुळे लठ्ठपणा कमी करणे, मधुमेही रुग्णांसाठी गुणकारी, यकृतातील चरबी कमी करण्यास मदत होते. राळा : यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढवते. त्यातील अँटीऑक्सिडन्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. तसेच अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर होतो. वरई : नवजात शिशु, बालक आणि माता यांच्यासाठी उत्तम पोषकधान्य आहे. सदृढ आरोग्य व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यास वरई उपयुक्त आहे. वरई मधुमेह, ह्रदयरोग यासारख्या रोगांचा धोका कमी करते.

# जनता दरबारात मांडल्या निराधारांसह शेतकऱ्यांच्या व्यथा

औसा :स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि निराधार संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांना खरीप २०२३ चा पीकविमा तात्काळ मिळावा आणि होऊ घातलेल्या पावसाळी अधिवेशनात निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची दरमहा ३००० रू मानधन वाढीची प्रलंबित मागणी मंजूर करावी यासह शेतकऱ्यांच्या व्यथा आ अभिमन्यू पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित जनता दरबारात शेतकरी नेते राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनी निवेदनाद्वारे मांडल्या.



आज देशात शेतकरी,शेतमजूर सुशिक्षित बेरोजगार असंख्य अडचणीने ग्रस्त आहे. हाताला काम नाही, शेती निसर्गाच्या प्रकोपामुळे परवडत नाही, पीकविम्यासारखी दळभद्री योजना असून अडचण अन नसून खोळंबा अशीच झाली आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली विमा कंपनी आपलंच उखळ पांढरं करुन घेत आहे.नुकसान भरपायीसाठी अनेक निकष घातले गेलेत जे सामान्य गावगाड्यातला शेतकरी पूर्ण करूच शकत नाही. याचा सरळ अर्थच असा की सरकारचं धोरण म्हणजे शेतकऱ्याचं मरण असून सरकार आणि विमाकंपनी यांचं साटंलोटं आहे.असा घाणाघाती आरोप केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांच्यावर संघटनेच्या वतीने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहेत.

औसा येथील महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिरात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पीकविमा कंपनी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्या सह सर्व विभागप्रमुख आणि त्यांच्या अधिनस्त कर्मचारी उपस्थित होते. या समाधान शिबिरात केवळ तोंडाला पाने पुसण्याचे प्रयोग झाल्याचे दिसून येते. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांच्या लोककल्याणकारी राज्याच्या संकलनेत सामान्य माणूस हाच केंदबिंदू मानून गावगाड्यातल्या शेवटच्या माणसाचं समाधान झालं पाहिजे. हिच भूमिका महात्मा गांधींनी मांडून खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी झाली पाहिजेत असा आशावाद ठेवला होता परंतु आजच्या राज्यकर्त्यांच्या निव्वळ हवेतील आत्मनिर्भर भारतच्या घोषनेने कुणाचं सुद्धा कल्याण होणार नसल्याची भूमिका शेतकऱ्याचा संघर्ष योद्धा रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र मोरे, सत्तार पटेल, अरुण दादा कुलकर्णी, नारायण नरखेडकर,मोहन चौरे, श्याम जाधव, अमर बिराजदार, ॲड सचिन धवन,गौतम कांबळे विवेक पाटील, बालाजी सूर्यवंशी, भरत पाटील सुरेश सूर्यवंशी, दगडू बरडे, आणि राजीव कसबे यांनी संपूर्ण राज्यात अनेक आंदोलनातून घेतल्याचे दिसून आलेले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मागणी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा ३००० रू मानधन मिळावे,खरीप व रब्बी २०२३ चा पीकविमा त्वरित मिळावा यासह विविध मागण्या पावसाळी अधिवेशनात मांडून न्याय द्यावा अन्यथा औशात दिवसा मशाली पेटवून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनी दिला आहे.

# शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी लातुरात धरणे आंदोलन

लातूर : मराठवाड्यातील पवनार ते पत्रादेवी शिघ्र द्रुतगती महामार्ग विशेष क्रमांक १०/ शक्तीपीठ महामार्ग महामार्ग रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी बाधित शेतकरी कृती समितीच्या वतीने मंगळवारी (दि. १८ जून ) लातूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आले.



या निवेदनावर कासारजवळा, आडगाव, औसा, डिगोळ देशमुख, गांजूर, लातूर, रेनापुर आणि औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. यावेळी आज सकाळी ११ वाजता लातूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून लातूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले . या महामार्गामुळे मराठवाड्यातील बाधित जमिनी अनेक सिंचन कालवे, नद्या, विहिरी,तलावांतर्गत कायमस्वरूपी बागायती, काळी कसदार सुपीक जमिनी आहेत. हजारो कुटुंबाचा उदारनिर्वाह या शेत जमिनीवरच अवलंबून असल्यामुळे हा महामार्ग रद्द करावा. तसेच देशांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. आता या महामार्गामुळे अनेक शेतकरी हे बेरोजगार होणार आहेत. शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न या नवीन शक्तीपीठ महामार्गामुळे निर्माण होणार आहे. पारंपरिक शेती व्यवसाय करणाऱ्यांना या महामार्गामुळे प्रचंड संकट निर्माण झाले आहे. अनेक शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता आहे. तसेच महामार्गाच्या कामात वृक्षतोड होत असल्यामुळे पर्यावरणाची प्रचंड हानी होणार आहे. त्याचबरोबर अनेक कारखाने या महामार्गामुळे बंद पडणार आहेत. म्हणून हा महामार्ग बंद करण्यात यावा. यासाठी भाई उदय गवारे, महाराष्ट्र राज्य किसान सभेचे कॉम्रेड सुधाकर शिंदे, कॉम्रेड संजय मोरे, कॉम्रेड विश्वंभर भोसले, कॉम्रेड दत्ता राऊतराव, कॉम्रेड दयाराम देशमुख, एडवोकेट के.डी जाधव, शिवाजी सुरवसे, अनिल ब्याळे, गजेंद्र येळकर यांच्यासह अनेक शेतकरी यामध्ये सहभागी झाले होते. यावेळी बोलताना शेकापचे ॲड. भाई उदय गवारे यांनी 'कंत्राटदार आणि राजकीय नेत्यांचे भले करण्यासाठी हा महामार्ग शेतकऱ्यांवर जबरदस्तीने लादण्याचे काम शासन करीत आहे त्यामुळे हा महामार्ग रद्द होणे गरजेचे आहे. तर मराठवाडा शक्तीपीठ महामार्ग कृती समितीचे ॲड. गजेंद्र येळकर यांनी जिल्ह्यातील रेणापूर , लातूर, औसा या तालुक्यातील अतिशय चांगल्या प्रतीची काळी कसदार सुपीक जमीन या शक्तिपीठ महामार्गामध्ये जात असून लातूर जिल्ह्यातील शेतीवर आश्रित असलेल्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. या महामार्गाची मार्गीका ऊस पट्ट्यातून जात असून ऊस बागायतदारांची मोठे नुकसान होऊन जिल्ह्याचे शेतीचे उत्पन्न घसरणार आहे. त्यामुळे हा महामार्ग रद्द होणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगितले. स्वाभिमानी शेतकरी संघटना लातूरचे धर्मराज पाटील यांनी यावेळी बोलताना शेतकऱ्यांना उद्धस्त करून विकासाच्या गप्पा मारणाऱ्या लोकांचा उद्देश शेतकऱ्यांना संपविणे हा दिसत आहे त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना न्याय हक्कासाठी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे स्पष्ट केले.

# बुवाबाजीने राजकारणाला बट्टा, नाना पटोलेंनी राजीनामा द्यावा

नागपूर, : अनेक निवडणुकांमधील सततच्या पराभवांनंतर लोकसभा निवडणुकीत विजयाने दिसलेला आशेचा एक किरण काँग्रेसमधील सरंजामशाहीला नवसंजीवनी देणारा ठरला असून गांधी घराण्यातील नेतापूजनाची परंपरा पटोलेपूजनापर्यंत पोहोचल्याचे आता पहावयास मिळत आहे. पराजयातही विजयाच्या उन्मादाने उन्मत्त झालेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी चक्क कार्यकर्त्याकरवी पाद्यपूजा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला काळीमा फासणारा असून याचे जाहीर प्रदर्शन करणाऱ्या नाना पटोलेंनी ताबडतोब पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून सन्यास घ्यावा,



अशी मागणी भाजपचे नागपूर जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे यांनी केली आहे.

शेगावच्या पालखीचे दर्शनानंतर चिखलाने भरलेले पाय कार्यकर्त्यांच्या हातून पटोले यांनी धुतल्याचे पडसाद आज दिवसभर राजकीय वर्तुळात सुरू आहेत. कोहळे म्हणाले,देशाच्या राजकारणात काँग्रेसने व्यक्तिपूजेची परंपरा सुरू केली. गांधी घराण्याचे हुजरे यामध्ये आघाडीवर राहिले. याच परंपरेचा शिरकाव काँग्रेसमध्ये तळागाळात पोहोचला असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांचे चिखलाने माखलेले पाय चक्क कार्यकर्त्यांनी पाण्याने धुतल्याचा प्रकार अकोला जिल्ह्यातील वाडेगाव येथे समोर आला आहे.

# राज्य सरकारने मांडला 'शैक्षणिक छळ'!

मुंबई : गेल्या अनेक दिवसांपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया न्यायालयीन पेचात रखडले आहेत. आज १८ जून रोजी मुंबई हायकोर्टात झालेल्या सुनावणीत कोर्टाने ही सुनावणी ११ जुलैपर्यंत पुढे ढकलली आहे. आज झालेल्या सुनावणीत पुण्यातील एक आणि मुंबईतील २ शिक्षण संस्थांनी न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली. त्यामुळे सुनावणी लांबली. कोर्टाने या हस्तक्षेप याचिका दाखल करून घेत त्यांना १० दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर अंतिम सुनावणी ११ जुलै २०२४ रोजी घेणार असल्याचे कोर्टाने सांगितले. दरम्यान राज्य सरकार विद्यार्थ्यांचा जणुकाही शैक्षणिक छळ करतोय असे दिसून येत आहे. यापूर्वी मुलींचे शिक्षण मोफत करण्याची घोषणा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली होती मात्र त्याची अजुनही अंमलबजावणी झाली नसल्याने पालकांत प्रचंड नाराजी होत आहे.




आरटीई २५ टक्के आरक्षणाच्या संदर्भात ९ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने एक अधिसूचना काढून आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल केला होता. या बदलानुसार आरटीई प्रवेशात १ किलोमीटर परिसरात शासकीय आणि अनुदानित शाळेतच प्राधान्याने विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार होता. त्यात खासगी विनाअनुदानित शाळांना वगळण्यात आलं होते. मात्र या बदलला अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा व मूव्हमेंट फॉर पीस जस्टीस फॉर सोशल वेल्फेअर यांनी विरोध करत मुंबई हायकोर्टात जनहित याचिका व रिट दाखल केली होती. त्यावर हायकोर्टाने सरकारच्या निर्णयाला स्थगिती देत पुन्हा प्रवेश प्रक्रिया पूर्ववत केली होती. मात्र कल्याण सिटीझन्स एज्युकेशन सोसायटी , मुंबई, असोसिएशन ऑफ इंडियन स्कूल्स, मुंबई व श्री चाणक्य एज्युकेशन सोसायटी, पिंपरी चिंचवड यांनी हस्तक्षेप याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली. संस्थांना १० दिवसांची मुदत मुंबई हायकोर्टात आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेवर सुनावणी सुरू असल्याने शालेय शिक्षण विभागानेही ७ जूनला लॉटरी सोडत काढली परंतु पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली नाही. याबाबत १२ जूनला सुनावणी होणार होती. परंतु काही कारणास्तव ही सुनावणी दुस–या दिवशी म्हणजे १३ जूनला ढकलण्यात आली. मात्र १३ जूनलाही सुनावणी झाली नाही. त्यानंतर आज १८ जूनला या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात आली. यात काही शाळांच्या हस्तक्षेप याचिका न्यायालयाने दाखल करून घेतल्या आहेत व हस्तक्षेप करणा–या तीनही संस्थाना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दहा दिवसाची मुदत न्यायालयाने दिली आहे. अंतिम सुनावणी ११ जुलैला या संस्थांच्या प्रतिपादनावर जनहित याचिकाकर्त्यांना व शासनाला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नंतरचे दहा दिवस देण्यात आले आहेत व याची अंतिम सुनावणी ११ जुलै २०२४ होणार आहे.

## संपादकीय....

# लोकसभाध्यक्षपदासाठी प्रथमच निवडणूक?

संसदेचे पहिले अधिवेशन सुरू होण्यापूर्वी लोकसभा अध्यक्षांची निवड केली जाणार असल्यामुळे या पदावर कोण विराजमान होईल, याविषयी चर्चा रंगली आहे. लोकसभा अध्यक्षांची सर्वसहमतीने निवड म्हणजे, एकप्रकारे सरकारचे शक्तिपरीक्षण असल्याचे मानले जात आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर आजवरच्या इतिहासात लोकसभा अध्यक्षांची नियुक्ती सर्वसहमतीने झाली आहे; मात्र यंदा या पदासाठी सर्वाधिक चुरस बघायला मिळत आहे.

केवळ सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतच नव्हे, तर रालोआ सरकारमध्ये सामील घटक पक्षांमध्येही अध्यक्षपदासाठी रस्सीखेच सुरू आहे. विरोधकांचा प्रामुख्याने लोकसभेच्या उपाध्यक्षपदावर डोळा आहे. उपाध्यक्षपद न दिल्यास विरोधक अध्यक्षपदासाठी उमेदवार उभा करतील. लोकसभा अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागेल, याबाबत सत्ताधारी पक्षाने गोपनीयता कायम ठेवली आहे. विरोधी पक्षांनीही या पदासाठी सरकारला शक्तिपरीक्षणासाठी बाध्य करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत; मात्र लोकसभा अध्यक्षांच्या निवडीसाठी आम्ही कोणाच्याही दबावात येणार नाही, या पदावर भाजपच्याच खासदाराची नियुक्ती केली जाईल, असे संकेत भाजपने रालोआ सरकारमधील घटक पक्षांना दिले आहेत; मात्र या पदावर विराजमान होणार्या व्यक्तीचे नाव भाजपने जाहीर केले नसल्याने गोपनीयता आणखी वाढली आहे.

रालोआ आघाडीतील मित्रपक्ष तर सोडाच, भाजपमधील केवळ ३ ते ४ नेते वगळता एकाही खासदाराला संभाव्य लोकसभा अध्यक्षाचे नाव माहिती नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच लोकसभा अध्यक्षांच्या नावावरून केवळ हवेत बाण सोडले जात आहेत. आंध्र प्रदेशच्या खासदार डी. पुरंदेश्वरी यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. त्यापाठोपाठ माजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाच पुन्हा संधी मिळणार असल्याचे बोलले जात आहे. पुरंदेश्वरी या एन. टी. रामाराव यांच्या कन्या असून, एन. चंद्राबाबू नायडू यांच्या पत्नी भुवनेश्वरी यांच्या भगिनी आहेत. पुरंदेश्वरी यांचे नाव लोकसभा अध्यक्षपदासाठी पुढे केल्यास नायडू यांचा मेहुणीच्या नावाला विरोध नसेल, असा तर्क लावला जात आहे.

माजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला हे मात्र भाजपचेच नेते असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विश्वासातील आहेत. सभागृहात मोदी यांना काय अपेक्षित आहे, याचा त्यांना नेमका अंदाज आहे. बिर्ला यांची जमेची बाजू म्हणजे, ते आपल्या महत्त्वाकांक्षांना मुरड घालतात. त्यामुळे लोकसभा अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची दुसर्यांदा निवड होण्याची जास्त शक्यता आहे. लोकसभा अध्यक्षांची सर्वसहमतीने निवड करताना विरोधी पक्षांची मनधरणी करणेही वाटते तितके सोपे नाही. यंदाच्या लोकसभेत विरोधी पक्षांची ताकद वाढल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही.

रालोआच्या घटक पक्षांमध्ये थोडी जरी नाराजी दिसून आली, तर विरोधी पक्ष त्याचा फायदा उचलून सत्ताधार्यांचा डाव उलटवण्याच्या तयारीत आहेत. विरोधी पक्षांनी तर यंदा लोकसभा अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याची तयारी चालविली आहे. त्यासाठी रालोआ आघाडीतील घटक पक्षांच्या नाराजीकडे लक्ष ठेवून डाव टाकण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. लोकसभा अध्यक्षपदासाठी तेलगू देसम पक्षाने उमेदवार उभा केल्यास आमचा त्यांना पाठिंबा राहील, असे विरोधकांनी स्पष्ट केले आहे. भाजपने उमेदवार उभा केल्यास आम्हीसुद्धा विरोधात उमेदवार देऊ, अशी विरोधकांची भूमिका आहे. विरोधकांनी उमेदवार दिला, तरीही आपला उमेदवार निवडून आणण्याइतके बहुमत सरकारकडे आहे; मात्र आघाडीमध्ये फूट पडल्यास काहीही होऊ शकते.

# ‘गुगल’ का बदलतंय?

गुगलच्या सर्च इंजिनच्या २५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच आर्टिफिशियल इंटिलिजन्सने दिलेल्या उत्तराचा समावेश केला जाणार आहे. ‘जनरेटिव्ह एआय’मध्ये सुरू असलेल्या उलथापालथीत गुगल देखील भरडला जात आहे. गुगलच्या जेमिनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समोर येणारी एआय सामग्री ही इंटरनेटवर मिळणा–या माहितीचे सारांश रूप असेल आणि ते स्रोतच्या लिंकसह समोर येईल.गुगलमध्ये होणारा बदल हा काळानुसार होत आहे. ‘परप्लेक्सिलिटी’ सारख्या एआयची शक्ती असलेल्या सर्च इंजिनमुळे गुगलवर दबाव वाढत आहे. चॅटजीपीटीची मालकी असलेली कंपनी ओपन एआय देखील स्वत:चा एआय सर्च टुल तयार करत आहे. एवढेच नाही तर एआय चॅटच्या माध्यमातून फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर सर्चिंग केले जात आहे. यासाठी गुगलची आवश्यकता युजरला भासत नाही.

गुगलच्या सर्च इंजिनच्या २५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच आर्टिफिशियल इंटिलिजन्सने दिलेल्या उत्तराचा समावेश केला जाणार आहे. ‘जनरेटिव्ह एआय’मध्ये सुरू असलेल्या उलथापालथीत गुगल देखील भरडला जात आहे. कॅलिफोर्नियातील एका कार्यक्रमात गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई म्हणाले, ‘मला घोषणा करताना आनंद होत आहे आणि आम्ही अमेरिकेत या आठवड्यात एक नवा अनुभव सांगण्यासाठी उत्सुक आहोत आणि तो म्हणजे ‘एआय ओवरव्हू’. हा आश्चर्यकारक बदलाचा अनुभव दुस–या देशातील नागरिक लवकरच घेऊ शकतील. एरवी गुगलच्या सर्चचे निष्कर्ष हे सामान्यपणे लिंक स्वरूपात येतात, मात्र त्याअगोदर एआय पुढचे पाऊल टाकत त्याचे संक्षिप्त सार समोर येईल. गुगलच्या जेमिनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समोर येणारी एआय सामग्री ही इंटरनेटवर मिळणा–या माहितीचे सारांश रूप असेल आणि ते स्रोतच्या लिंकसह समोर येईल. गुगलच्या सर्च टीमचे प्रमुख लिज रीड म्हणाले, आपल्या डोक्यात जे काही असेल आणि आपण जे काही करू इच्छितात, त्याची विचारणा करू शकतात. मग योजना असो किंवा योजना असो. यासाठी गुगल मेहनत करेल.बदलाचे कारण गुगलमध्ये होणारा बदल हा काळानुसार होत आहे. ‘परप्लेक्सिलिटी’ सारख्या एआयची शक्ती असलेल्या सर्च इंजिनमुळे गुगलवर दबाव वाढत आहे. चॅटजीपीटीची मालकी असलेली कंपनी ओपन एआय देखील स्वत:चा एआय सर्च टुल तयार करत आहे. एवढेच नाही तर एआय चॅटच्या माध्यमातून फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर सर्चिंग केले जात आहे. यासाठी गुगलची आवश्यकता युजरला भासत नाही. या पर्यायाने उमटणा–या प्रतिक्रिया सकारात्मक आहेत. कारण या सर्चचे निकाल पारंपरिक रूपातील उत्तर नसतात. अर्थात कंटेट तयार करणारे आणि किरकोळ प्रकाशक या बदलावरून थोडे गोंधळात पडले आहेत.

या नवीन फीचरमुळे नागरिक आता लिंकवर क्लिक करून संकेतस्थळाच्या माध्यमातून माहिती गोळा करणार नाहीत. रिसर्च फर्म गार्टनर यांच्या अंदाजानुसार, एआय बॉटच्या वापरामुळे २०२६ पर्यंत सर्च इंजिनच्या माध्यमातून संकेतस्थळावर येणा–या युजरची संख्या ही २५ टक्क्यांनी कमी होऊ शकते. चॅटजीपीटीच्या स्टाईलमध्ये ‘एआय’चा वापर हा गुगलच्या व्यवसायावर काय परिणाम करेल? या प्रश्नावर गुगलचे सर्च प्रमुख रीड यांनी बचावात्मक भूमिका घेतली. ते म्हणाले. एआय ओवरव्यूच्या मदतीने युजर सर्च इंजिनचा वापर अधिक करत आहेत आणि ते त्याच्या परिणामाने समाधानी आहेत. कंपनीच्या मते, जनरेटिव्ह एआय टूल ग्राहकांचे जीवन सुस करत आहे. आता ते एआय ओवरव्यूच्या मदतीने रविवारीही सुरू राहणा–या योगा स्टुडिओचा शोध घेतील किंवा एखादा आवडीचा खाद्यपदार्थ. परिणामी गुगल लवकरच व्हीडीओ आधारित कंटेट सर्चसाठी ‘एआय’ चा वापर कसा करता येईल याची चाचणी देखील करेल.

गुगलचा नवा प्रोजेक्ट

गुगल आता ‘एक्स्ट्रा’ या नव्या प्रोजेक्टची देखील झलक सादर करत आहे. या प्रोजेक्टमध्ये डिजिटल असिस्टंट विकसित केले जात आहे आणि ते लहान–मोठे काम करण्यास सक्षम असतील. गुगलच्या ‘डिपमाईंड’चे प्रमुख डेमिस हसाबिस म्हणतात, आम्ही दीर्घकाळापासून दैनंदिन जीवनात मदत करणा–या व्यापक स्वरूपातील एआय एजंटची निर्मिती करू इच्छित आहोत. आम्ही असे एक भविष्य घडवत आहोत की तेथे कुशल सहायक असेल मग तो मोबाईल फोन असो किंवा नव्या रूपातील असणारा चष्मा. एआय एजंटचा प्रयोग हा गुगलच्या काही प्रॉडक्टवर होईल. जसे येतील. सध्या कॉम्प्युटरवरची ब्राऊझिंग हिस्ट्री ही रिसायकल बिन क्लीन केल्यानंतर सापडत नाही. मात्र को–पायलटच्या मदतीने कोणत्याही प्रकारचे डॉक्युमेंट, वेबपेज किंवा फाईल पुन्हा घेता येऊ शकते. कोपायलट सादर करताना कंपनीने व्हॉईस असिस्टंट हा रिअल टाईम कोच होतो आणि माईनक्राफ्टसारखा व्हीडओ गेम खेळण्यासाठी युजरची कशी मदत करतो, हे कंपनीने दाखविले. अशा साहाय्यकाचा वापर अभ्यास करणे आणि कॅलेंडरला अपडेट करण्यासाठी देखील केला जातो. मायक्रोसॉफ्टच्या मते, चॅटजीपीटीचे नवे व्हर्जन जीपीटी–४ देखील लवकरच कोपायलटचा हिस्सा असेल. को–पायलट प्लसयुक्त संगणकाची किंमत १ हजार डॉलरने सुरू होते. कंपनीच्या मते, त्याची विक्री जून महिन्यात




जेमेनी ॲप आणि वर्षाच्या शेवटी असिस्टंटवर. एआय जगात गुगलचा ‘ओपन एआय’शी जोरात सामना होत आहे. ‘ओपन एआय’ने या आठवड्यात एआय सर्चचे नवीन व्हर्जन जीपीटी–४ लॉंच केले. हे नवीन व्हर्जन आवाज, चाचणी आणि फोटोच्या माध्यमातून कमांड देईल. जेनरेटिव्ह एआय तंत्रज्ञान हे जगातील नवीन रणभूमी आहे. तेथे अनेक गोष्टी वेगाने बदलत आहेत. आयफोनवर चॅटजीपीटीच्या तंत्राचा वापर होत असताना दुसरीकडे ओपन एआय आणि ॲपल यांच्यात होत असलेल्या कराराच्या बातम्या देखील या स्पर्धेची एक झलक आहे.

मायक्रोसॉफ्टचा नवा एआय पर्सनल संगणक

दिग्गज अमेरिक टेक कंपनी मायक्रोसॉफ्टने एआय फीचर्सयुक्त पर्सनल कॉम्प्युटर न्यू जनरेशन आणले. वॉशिंग्टनमध्ये आपल्या रेडमंड कॅम्पसमध्ये मायक्रोसॉफ्टचे चीफ एक्झिक्युटिव्ह सत्या नाडेला यांनी कोपायलट प्लस पर्सनल कॉम्युटर्स लॉंच केले. कोपायलट प्लस कॉम्युटर्स हे आर्टिर्फिशियल इंटिलिजन्सयुक्त आहे. सध्या संगणकात एआयचा वापर करण्यासाठी क्लाऊड बेस्ड एआय प्लॅटफॉर्मपर्यंत जावे लागते. मायक्रोसॉफ्टच्या मते, कोपायलट प्लस क्लाऊड डेटा सिस्टिमशिवाय एआयशी संबंधित असणारे टास्क पूर्ण करेल.

को–पायलट काय करू शकतो?

यात रिकॉल नावाचे फीचर आहे. या माध्यमातून युजरना आपल्या संगणकावरचे टास्क अनेक महिन्यानंतरही ट्रेस करता सुरू होईल. पर्सनल कॉम्प्युटर तयार करणारे बा निर्माते जसे एसर, आसुस्टेक कंपन्याही त्याची विक्री करू शकतील.

बाजारात कोणाचा दबदबा?

मायक्रोसॉफ्टचे कन्झ्युमर मार्केटिंग हेड युसूफ मेहदी यांच्या मते, पुढील वर्षापर्यंत पाच कोटी एआय पीसींची विक्री होईल. ते म्हणतात, दीर्घकाळानंतर पर्सनल कॉम्प्युटरला प्रत्यक्षात अपडेट करण्याची संधी आता आली आहे. कॉम्प्युटरवर थेटपणे चालणारे एआय असिस्टन्स हा देखील मोठा बदल आहे, असे ते मानतात. कॉम्प्युटिंगशी संबंधित प्रत्येक गोष्ट ही क्रांतिकारी मानली जाते. एका अंदाजानुसार, आगामी काळात हा बाजार अब्जावधी डॉलरचा राहू शकतो. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अनेक टेक कंपन्या आणि स्टार्टअप या बाजारावर छाप पाडू शकतात. गुगलची पालक कंपनी अल्फाबेट आणि ॲपल देखील या शर्यतीत आहे. पर्सनल कॉम्प्युटरमध्ये अजूनही खूप काम स्वत:ला करावे लागते. वास्तविक फोन एडिट करणे, एक्सल शिट मॅनेज करणे, प्रझेंटेशन तयार करणे आणि आकडेमोड करणे यासारख्या गोष्टींचा त्यात समावेश आहे. एआय फीचर्सयुक्त संगणकाच्या माध्यमातून अनेक काम व्हॉईस कमांडच्या मदतीने केले जाते. या नव्या विश्वात कोणत्या कंपनीचे कोणते तंत्रज्ञान विश्वासार्ह आहे, यासाठी मोठी चढाओढ लागली आहे.

# अरब- इस्त्रायल संघर्षाचा कृतघ्न इतिहास



२४ एप्रिल ते ८ मे २०२४ या सुमारे १५ दिवसांच्या काळात पॅलेस्टाईन, अरब आणि हमास या तेथील दहशतवादी संघटनेविषयी सहानुभूती व्यक्त करणारे वृत्त एका संकेतस्थळावरून प्रसिद्ध झाले. या घटनेशी सोमय्या महाविद्यालयाच्या प्राचार्य परवीन शेख यांचा संबंध असल्याचे पुढे आले. त्यानंतर या शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाने त्यांना स्वत:हून राजीनामा देण्यास सांगितले परंतु शेख यांनी स्वत:हून राजीनामा देण्यास साफ नकार दिला. परिणामी सोमय्याच्या व्यवस्थापनाने परवीन यांना बडतर्फ केले.

व्यवस्थापनाची भूमिका शिक्षणाच्या माध्यमातून समाजात समजूतदारपणा वाढविणे आणि सामाजिक जबाबदारी पार पाडणे, यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, अशा शब्दांत सोमय्याच्या व्यवस्थापनाने आपली भूमिका मांडली आहे. अर्थात सोमय्या शिक्षण संस्थेत घडलेली घटना हा या लेखाचा विषय नसून मध्यपूर्वेतील पॅलेस्टाईन या लहानशा प्रदेशाचे मूळ रहिवासी कोण आणि हलवायाच्या घरावर तुळशीपत्र कुणी ठेवले आहे, कोण कोणावर अन्याय, अत्याचार करत आहे, याची शहानिशा करणे हा प्रस्तुत लेखाचा विषय आहे. सोमय्या शिक्षणसंस्थेतील उपरोक्त घटना, ही त्याची केवळ पार्श्वभूमी आहे.

पॅलेस्टाइनमध्ये सध्या जे लोक राहतात, त्यांचे पूर्वज सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी आपल्या मूळ भूमीतून परागंदा होऊन तिथे आले आणि स्थायिक झाले. त्यांनी तिथे आपल्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाची सुरुवात नव्याने केली. पण या सर्व धुमश्चक्रीत त्यांनी सुरू केलेल्या कालगणनेमुळे त्यांच्या या भ्रमंतीचा व नंतर पॅलेस्टाईनमध्ये स्थिरावलेल्या ज्यूंच्या इतिहासाचा अभ्यास करण्याचे एक विश्वासार्ह साधन इतिहासाच्या अभ्यासकांना प्राप्त झाले. काळाच्या ओघात पॅलेस्टाईनमध्ये स्थिर जीवन जगू लागलेल्या या समाजाच्या जीवनात काही चढ–उतारही आले. काहींना युरोप किंवा इतरत्र जाऊन आपले नशीब आजमावेसे वाटले. तर काही तिथेच स्थायिक झाले.

सावकारी किंवा बँकिंग हे या पॅलेस्टिनी ज्यूंचे विशेष आवडीचे व्यवसाय! पण पॅलेस्टाईनसारख्या लहानशा देशात सावकारीला मुळातच मर्यादा असतात, म्हणून या ज्यूंपैकी काहींनी आपला मोर्चा युरोपकडे वळवला. इथे मात्र त्यांच्या गुणांना भरपूर वाव मिळाला. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनीसारख्या युरोपीय देशांत त्यांनी बँकिंग व्यवसायात प्रचंड यश मिळविले. शेक्सपीअरच्या ‘मर्चंट ऑफ व्हेनिस’ या नाटकातील शायलॉक हा ज्यू आहे. नुसता ज्यू नाही तर झायॉनिस्ट ज्यूंच्या व्यक्तिमत्त्वातील सावकारी त्याच्या व्यक्तिमत्त्वात उतरविण्यात नाट्य लेखक पूर्णपणे यशस्वी झाला आहे, असे आपण म्हणू शकतो.

पहिल्या महायुद्धाच्या काळात याच झायॉनिस्ट ज्यूंनी ब्रिटिश सरकारला भरपूर आर्थिक मदत केली होती आणि ब्रिटिशांनाही या उपकारांची परतफेड चांगली केली होती. पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण व्हावे, हे झायॉनिस्टांचे प्रदीर्घ काळापासूनचे स्वप्न होते आणि आता ते स्वप्न साकार होण्याची वेळ आली होती. आपल्या वचन पूर्ततेसाठी ब्रिटिशांनी १९१७ साली आर्थर बालफोर या झायॉनिस्ट ज्यू व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली एक आयोग स्थापन केला. हाच आयोग पुढे बालफोट आयोग या नावाने ओळखला जाऊ लागला. ब्रिटिशांच्या कूटनितीची सुरुवातही इथूनच झाली. वास्तविक पॅलेस्टाईन समस्येशी ब्रिटिश, झायॉनिस्ट ज्यू आणि पॅलेस्टाईन मूळ रहिवासी अरब असे तीन पक्ष संबंधित होते. त्यांचे भविष्य आणि अस्तित्वच पॅलेस्टाईनच्या भूमीशी नैसर्गिकरित्या जोडले गेलेले होते. त्या पॅलेस्टिनी अरबांना बालफोट आयोगावर कसलेही प्रतिनिधित्व देण्यात आले नव्हते. किंवा त्यांची बाजू मांडण्याची कसलीही तरतूद करण्यात आली नव्हती. उलट ब्रिटिश सरकार किंवा झायॉनिस्ट ज्यू यांपैकी कुणाचाही पॅलेस्टाईनच्या भूमीवर कसलाही अधिकार नव्हता. तरीही ब्रिटिश सरकारने झायॉनिस्टांना पॅलेस्टाईनमध्ये कायमचे प्रस्थापित करण्याचा ‘यशस्वी!’ प्रयत्न केला आणि तितक्याच प्रभावीपणे पॅलेस्टिनी अरबांचा त्या भूमीवरील नैसर्गिक अधिकार पूर्णत: नाकारण्यात आला. १५ मे १९४८ च्या मध्यरात्री पॅलेस्टाईनवरील सत्तेचा त्याग करण्याची घोषणा करून ब्रिटिशांनी एका दगडात दोन पक्षी मारले. एकीकडे पॅलेस्टाईनची भूमी झायॉनिस्टांच्या झोळीत टाकली तर दुसरीकडे स्वत:च निर्माण केलेल्या अन्यायकारक परिस्थितीतून स्वत:ला मुक्त करून घेतले.

गेल्या शतकात किंबहुना त्याहून अधिक काळ युरोपमधील ज्यूंना अनन्वित अत्याचार सहन करावे लागले हेसुद्धा न नाकारता येणारे सत्य आहे. पण त्याबद्दल पॅलेस्टिनी अरबांना जबाबदार धरण्यात आले. इतकेच नव्हे तर त्याबद्दल त्यांना मिळालेली शिक्षा त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांपेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. दुर्दैव म्हणजे आजच्या पिढीलाही ती भोगावी लागत आहे.

या प्रकरणातील विरोधाभास असा की सुमारे पाच– साडेपाच हजार वर्षांपूर्वी वर्तमानकाळातील झायॉनिस्ट ज्यूंचे पूर्वज इजिप्तमधील फारोही राजांच्या जुलमाना कंटाळून निराश्रीत होऊन पॅलेस्टिनी अरबांच्या दारात आले तेव्हा त्यांना त्या अरबांनी सर्व तऱ्हेची मदत केली. आपल्या वडिलोपार्जित भूमीवर निवारा दिला आणि आपल्याप्रमाणेच त्यांनाही आपल्या देशाचे नागरिकत्व दिले. आजच्या झायॉनिस्ट ज्यूंनी मात्र या सद्भावनेची परतफेड पराकोटीच्या कृतघ्न भावनेने केली. मुळात त्यांची ज्यू राष्ट्राची संकल्पनाच कमालीची संकुचित आहे.

इस्त्रायली राष्ट्राची संकल्पना ‘ज्या प्रदेशाच्या भौगोलिक सीमा निश्चित वा अधोरेखित करण्यात आलेल्या असतात अशा प्रदेशात झायॉनिस्ट विचारप्रणाली व मूल्यांवर निष्ठा ठेवणरे लोक आणि पर्यायाने समाज राहत असतो तो प्रदेश म्हणजे इस्त्रायली राष्ट्र,’ अशी झायॉनिस्ट ज्यूंनी आपल्या राष्ट्रवादाची व्याख्या केली आहे. पण एवढ्यावर झायॉनिस्ट नेत्यांचे व विचारवंतांचे समाधान झाले नाही. आपली ही विचारप्रणाली व जीवनमूल्ये भावी पिढ्यांपर्यंत जशीच्या तशी पोहोचली पाहिजेत असाही त्यांचा आग्रह होता आणि आहे. त्यासाठी लहानपणापासून काळजी घेतली जाते. त्यांच्या राष्ट्रीय संस्काराची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

– झायॉनिस्ट चळवळीतील प्रत्येक सदस्याने आपले प्राक्तन इस्त्रायली राष्ट्राच्या प्राक्तनाशी जोडणे आपले कर्तव्य मानले पाहिजे.

– प्रत्येक झायॉनिस्ट व्यक्तीने आपल्या कुटुंबातील किमान एका व्यक्तीला तरी झायॉनिस्ट काँग्रेसकडे राष्ट्रकार्यासाठी पाठविले पाहिजे.

– प्रत्येक झायॉनिस्ट व्यक्तीने आपल्या राष्ट्राचे संरक्षण करण्यासाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे. तसेच आपले धर्मबंधू जिथे असतील तिथे त्यांच्या अधिकारांचे रक्षण केले पाहिजे.

– प्रत्येक ज्यू कुटुंबियाने आपल्या मुलांना हिब्रु भाषा व ज्यू संस्कृतीचे शिक्षण दिले पाहिजे.

ही यादी आणखी वाढवता येईल. पण झायॉनिस्ट चळवळीची कट्टरता समजून घेण्यासाठी एवढा नमुना पुरेसा आहे, असे वाटते.

इस्त्रायली राष्ट्राच्या निर्मितीसाठी १५ मे १९४८ च्या मध्यरात्रीचा मुहूर्त ब्रिटिशांनी आधीच निश्चित केला होता व त्याला जाहीर प्रसिद्धीही दिली होती. त्यामुळे या क्षणाची वाट पहाणे व नव्याने जन्माला येणाऱ्या राष्ट्राचे स्वरूप व जडणघडण कशी असावी याचे स्वप्न पहावे एवढेच झायॉनिस्टांच्या हाती होते. विशेष म्हणजे ही गुंतागुंतीची परिस्थिती समर्थपणे हाताळू शकेल अशा समर्थ नेत्याकडे सोपविण्यात आली होती. त्या नेत्याचे नाव होते डेव्हिड बेन गुरीयन. त्यांनीही त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी यथायोग्य रीतीने पार पाडली. त्याचे चरित्रकार बज जोहर याने ‘आर्मड् प्रॉफेट’ (सशस्त्र प्रेषित) या दोन शब्दांत त्यांचे यथायोग्य वर्णन केले आहे.

१५ मे १९४८ च्या मध्यरात्री घड्याळाने रात्रीचे बाराचे ठोके दिले आणि डेव्हिड बेन गुरीयन यांनी झायॉनिस्ट इस्त्रायल राष्ट्र जन्मल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे त्याच क्षणी डेव्हिड बेन गुरीयन हे या नव्या राष्ट्राचे पहिले पंतप्रधान झाल्याचेही जाहीर करण्यात आले. तरीही ते राष्ट्र बेकायदा असल्याचे चिकित्सकांनी मानले. कारण त्याची निर्मिती ना दोन पक्षांतील करारमदारानुसार झाली होती ना युनोच्या किंवा इतर कुठल्याही आंतरराष्ट्रीय करारनाम्यानुसार झाली होती. तरीही त्याच दिवशी ब्रिटिश सरकारने या नव्याने अस्तित्वात आलेल्या राष्ट्राला मान्यता दिली. नंतरच्या दोन– तीन दिवसांत अमेरिका, फ्रान्स आणि रशियासारख्या मातबर राष्ट्रांनीही मान्यता दिली. साहजिकच त्याला आपोआपच प्रतिष्ठा प्राप्त झाली.

# अंडा टोस्ट की व्होकॅडो टोस्ट; नाश्त्यात कोणता पदार्थ खावा? जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात..

चांगल्या आरोग्यासाठी आपल्याला चांगल्या आहाराची खूप आवश्यकता असते, पण अनेकदा धावपळीच्या आयुष्यात आपण आहाराकडे लक्ष देत नाही. जर सकाळी पोषक नाश्ता केला तर तुम्ही दिवसभर उत्साही राहू शकता. याविषयी न्यूट्रिशनिस्ट सुमन अग्रवाल त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून सांगतात, बरेच लोक अंडी खाणे सोडतात आणि व्होकॅडो खातात? पण, तुम्हाला या दोन पैकी कोणते चांगले आहेत हे माहिती असायलाच पाहिजे.

त्या सांगतात, एका व्होकॅडोमध्ये २४० कॅलरी असतात, तर एका अंड्यामध्ये ७० कॅलरी असतात. एका व्होकॅडोमध्ये ३ ग्रॅम प्रोटिन असते, तर एका अंड्यामध्ये ६ ग्रॅम प्रोटिन असते. एका व्होकॅडोमध्ये १३ ग्रॅम कर्बोदके असतात, तर एका अंड्यामध्ये कर्बोदके एक ग्रॅमपेक्षाही कमी असतात. त्यामुळे तुमचा नाश्ता विचारपूर्वक निवडा.



व्होकॅडो की अंडी; कोणता पर्याय चांगला? हैदराबाद येथील केअर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगतात, दोन्ही पर्याय पौष्टिक आहेत, पण हे पदार्थ वेगवेगळ्या आहाराच्या गरजा पुरवतात.अंडा टोस्ट सुषमा सांगतात, अंडा टोस्ट हा एक उत्तम नाश्त्याचा पर्याय आहे. प्रोटिनयुक्त असलेला हा नाश्ता आपले आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात. अंड्यामध्ये जीवनसत्त्वे ए, डी, इ आणि बी १२ असतात. या पोषक घटकांबरोबरच यामध्ये लोह आणि खनिजे असतात. अंड्यामधील प्रोटिन्स स्नायूंना वाढण्यास मदत करतात, जे नियमित व्यायाम करतात त्यांनी अंडा टोस्ट नाश्त्यात खावा.

याशिवाय अंड्यामध्ये कोलीन असतात, जे मेंदूच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. अंडा टोस्ट खाल्ल्याने तुम्हाला भूक लागत नाही आणि त्यामुळे दिवसभर स्नॅक्सपासून तुम्ही दूर राहता. तुम्ही धान्यांपासून बनवलेला ब्रेड निवडून पौष्टिक मूल्य आणखी वाढवू शकता, ज्यामुळे तुमच्या आहारात फायबरचा समावेश होतो. फायबर हे पचनक्रियेस मदत करते आणि हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते, असे सुषमा पुढे सांगतात.

व्होकॅडो टोस्ट गेल्या काही वर्षांत व्होकॅडो टोस्ट हा लोकप्रिय नाश्ता झाला आहे. अनेक पोषक आहार घेणारे लोक व्होकॅडोचा नाश्त्यात समावेश करतात. सुषमा सांगतात, व्होकॅडोमध्ये चांगले मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. याशिवाय पोटॅशियमसह के, सी आणि ई सारखी विविध जीवनसत्त्वेसुद्धा असतात. ही जीवनसत्त्वे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

व्होकॅडो हा एक स्वादिष्ट आणि पोषक आहार आहे. व्होकॅडो टोस्टदेखील फायबरचा एक चांगला स्रोत आहे, जो पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतो आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतो. व्होकॅडोमध्ये असलेले चांगले फॅट्स तुम्हाला संपूर्ण दिवसभर उत्साही ठेवण्यास मदत करतात, असे सुषमा सांगतात.

अंडा टोस्ट आणि व्होकॅडो टोस्टमधील कोणता पदार्थ नाश्त्यासाठी निवडावा, हे आपल्या पौष्टिक गरजा आणि चव प्राधान्यांवर अवलंबून आहे. सुषमा पुढे सांगतात, जर तुम्ही भरपूर प्रोटिनयुक्त आहाराचा पर्याय शोधत असाल, जो स्नायूंना बळकट करण्यास आणि मेंदूच्या आरोग्यास चांगला आहे तर तुम्ही अंडा टोस्ट हा पर्याय निवडू शकता. याशिवाय जर तुम्हाला हृदयाचे आरोग्य चांगले ठेवण्यास व रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करणारे फायबर आणि चांगले फॅट्सयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करायचा असेल, तर तुम्ही व्होकॅडो हा पर्याय निवडू शकता.

अंडा टोस्ट आणि व्होकॅडो टोस्ट हे दोन्ही नाश्त्यासाठी उत्तम पर्याय आहेत, जे संतुलित आहार घेण्यास मदत करतात. तुमच्या आहाराच्या गरजा लक्षात घेऊन पौष्टिक नाश्त्याने दिवसाची सुरुवात करावी.

# फ्रिझी केसांसाठी रासायनिक उत्पादने वापरण्याऐवजी हे घरगुती उपाय करून पहा

प्रत्येकाला सुंदर आणि निरोगी केस आवडतात. केसांना चमकदार आणि रेशमी बनवण्यासाठी आजकाल बाजारात अनेक उपचार उपलब्ध आहेत. पण आजही घरगुती उपचार बाह्य उपचारांपेक्षा सुरक्षित आणि अधिक प्रभावी मानले जातात. उन्हाळ्यात केसांची कुरकुरीतपणा अनेकदा वाढतो.



कोरफड जेल हा कुरकुरीत केसांची काळजी घेण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे जो तुम्ही अनेक प्रकारे वापरू शकता. आज या लेखात आम्ही तुम्हाला एलोवेरा जेलच्या मदतीने केसांची काळजी कशी घेऊ शकता तसेच तुम्हाला त्यांच्यापासून मिळणाऱ्या फायद्यांबद्दल देखील माहिती जाणून घ्या.

एलोवेरा जेल केसांवर लावल्याने फायदे होतात

एलोवेरा जेलमध्ये व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-सी आणि व्हिटॅमिन-बी असते ज्यामुळे केसांना भरपूर पोषण मिळते.

यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट गुणधर्म केसांना हायड्रेट करण्यास मदत करतात.

एलोवेरा जेलमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात जे केसांना सर्व प्रकारच्या संसर्गापासून वाचवतात. केसांचा कुरकुरीतपणा कमी करण्यासाठी दही आणि कोरफड जेलचा हेअर मास्क लावा.एका भांड्यात २ ते ३ चमचे दही घ्या.कोरफडीच्या पानातून जेल काढा आणि त्यात घाला.हे दोन्ही मिसळा आणि टाळूपासून केसांच्या लांबीपर्यंत लावा.हा हेअर पॅक १ ते २ तास तसाच राहू द्या.आता केस पाण्याने आणि शाम्पूने धुवा.केस धुतल्यानंतर कंडिशनर आणि हेअर सीरम लावा. अशा प्रकारे आपण आठवड्यातून २ वेळा प्रयत्न करू शकता. त्याच्या सतत वापराने केसांचा पोत पूर्वीपेक्षा चांगला होईल.

# लातूर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांस मालमत्ताकरामध्ये सवलत

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका, प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिंनांक. १०/०६/२०२४ अन्वये प्रशासक तथा आयुक्त मा.बाबासाहेब मनोहरे यांनी मनपा हद्दीतील वेळेत थकीत व चालू कराचा एकरक्कमी भरणा करणा-या मालमत्ताधारकांस मालमत्ताकरामध्ये (सामान्यकरामध्ये) खालील प्रमाणे विशेष सवलत देण्यात येत आहे.१.मालमत्ताकरामध्ये १०% सवलत

जे मालमत्ताधारक २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी करतील अशा मालमत्ताधारकांस जुन २०२४ आखेर पर्यंत मालमत्ता करामध्ये सुट ७% व ऑन लाईन ३ % देण्यात येत आहे.

२. महिलाच्या नावे व दिव्यांगाच्या नावे असलेल्या एकच निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये (मालमत्ताकरामध्ये) ५% सूट देण्यात येते. (शासन नियमानुसार व जिल्हा शैल्यचिकीत्सक यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र लाभधारकास सादर करणे आवश्यक असेल.)३. स्वतंत्र सैंनिक व त्यांच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये (मालमत्ताकरामध्ये) ५०% सूट देण्यात येते सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.४. सन २०२४-२५ या अर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर सामन्य करामध्ये प्रति वर्ष दोन्ही बाबीसाठी ५% सूट देण्यात येते.

सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवण्यात आल्याचे क्षेत्रीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये स्वतः च्या इलेक्ट्रीक वाहानाकरिता चार्जिग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इतर इलेक्ट्रीक्ल वाहनधारकांना चार्जिग सुविध्दा उपलब्ध केल्यास शासन निर्णयानुसार देय मालमत्ताकराच्या सामान्यकरावर २% सूट देण्यात येते.

सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी राबवण्यात आल्याचे महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये क्षेत्रीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

वरील सवलती या देण्यात येत असून शहरातील मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन मनपास सहकार्य करावे व मनपाचे करदाते व्हावे. तसेच ऑनलाईन कराचा भरणा करण्यासाठी सिटीझन ॲप किंवा या वेबसाईटचा वापर करावा व आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी आणि पालकांचे उत्साहात स्वागत

लातूर :- महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या आज दि. १८ जून २०२४ पासून नियमित वर्गांना सुरुवात झाली. महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पहार तर विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.




आज महाविद्यालयातील बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा पहिला दिवस असल्याने स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे महाराष्ट्रातील ०५ शाखांमधून शिक्षण देणारे एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅकने अ दर्जा बहाल केला आहे. महाविद्यालयात येणारा विद्यार्थी ग्रामीण व शहरी भागातील असून गरीब आणि गरजू विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. आज पालक आणि विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ बघून मनस्वी आनंद झाला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार म्हणाले की, लातूरच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये नियमित वर्गात उपस्थित राहून नियमित अभ्यास केल्यास विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होते. हा लातूर पॅटर्नचा यशस्वी होण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांचा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमामुळे वाढ होते असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी मानले. यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनीही विद्यार्थी आणि पालकांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ बोडके, शुभम बिरादार आणि जगन्नाथ येचेवाड यांनी परिश्रम घेतले.

# माझ्यासारख्या कुठल्याही राजकीय प्राश्वभूमी नसलेल्या व्यक्तीला आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे खासदार होता आले.-नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे

लातूर प्रतिनिधी

माझ्यासारख्या कुठल्याही राजकीय प्राश्वभूमी नसलेल्या व्यक्तीला आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे खासदार होता आले.महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उन्हाची तमा न बाळगता माझ्या विजयासाठी अटोकाट प्रयत्न केले या विजयाचे श्रेय आपले आहे .आपण केलेल्या परिश्रमाची उत्तराई करण्यासाठी येथून पुढील काळात प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे यांनी सांगितले .

नूतन खासदार डॉ शिवाजीराव काळगे हे निवडून आल्यानंतर प्रथमच रेणापूर तालुक्यात आल्याने त्यांचे माहविकास आघाडीच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करीत जंगी स्वागत करण्यात आले. येथील ग्रामदैवत रेणुका मातेची पुजा करून आर्शिवाद घेतले .



लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ . शिवाजी काळगे निवडून आले .खा.डॉ . काळगे यानी रेणापूर तालुक्यातील मतदारांचे आभार मानण्यासाठी रेणुका देवीमंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमास माजी आ. त्र्यंबक नाना भिसे , रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे , माजी चेअरमन यशवंतराव पाटील, व्हा चेअरमन अनंतराव देशमुख ,लातुर ग्रामीणचे निरीक्षक अनुप शेळके , राष्ट्रवादी कॉग्रेसचे ( शरदचंद्रजी पवार ) तालुकाध्यक्ष बालाजी कदम , लालासाहेब चव्हाण , उमाकांत खलंग्रे , प्रविण पाटील ,कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष ड प्रमोद जाधव , शहराध्यक्ष मतीन अली सय्यद यांच्यासह महाविकास आघाडीचे, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यानंतर रेणापूर शहर व तालुका कॉग्रेस , रेणा सहकारी साखर कारखाना निवाडा ,राष्ट्रवादी कॉग्रेस ( शरदचंद्रजी पवार) , शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वतीने नुतन खासदार डॉ . शिवाजी काळगे यांचा सत्कार करण्यात आला . तसेच रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव , कोळगाव , खरोळा , कामखेडा , कारेपूर , निवाडा , यशवंतवाडी , खलंग्री , दवणगाव , डिघोळ देशमुख , सय्यदपुर , गरसुळी , बावची , इंदरठाणा यासह अदि ग्राम पंचायतीच्या सरपंच , उपसरपंच व सदस्य यांच्या वतीने खासदार डॉ काळगे यांचा सत्कार करण्यात आला तसेच तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व सन्माननीय पदाधिकारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला . तसेच दत्त कृपा मजुर सहकारी संस्थेचे च्या वतीने सत्कार करण्यात आला .

रेणापूरात जंगी स्वागत

नुतन खासदार डॉ शिवाजी काळगे रेणापूर शहरात आल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत डॉ . काळगे यांचे जंगी स्वागत करण्यात आले. ग्रामदैवत रेणुका मातेचे दर्शन घेतल्या नंतर ट्रस्टच्या वतीने रेणुका मातेची प्रतिमा भेट देवुन सत्कार करण्यात आला .

लातुर जिल्ह्याला शिवाराज पाटील चाकुरकर ,लोकनेते विलासराव देशमुख , डॉ जनार्धन वाघमारे यांच्या सारख्या विचारवंत मंडळीनी जी सुसंस्कृत राजकारणाची परंपरा सुरू केली आहे . तीच परंपरा सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख , माजी मंत्री आ.अमित देशमुख व लातुर ग्रामीणचे आ . धिरज देशमुख यांनी जोपासली आहे . तोच वसा त्याच्या मार्गदर्शनाखाली चालवणार असल्याचे सांगून सर्वांना सोबत घेवुन आपल्या भागाचा जास्तीत जास्त कसा विकास करण्याचा माझा प्रयत्न असेल असे नूतन खासदार डॉ . शिवाजी काळगे म्हणाले

रेणा सहकारी कारखान्याच्या वतीने नुतन खासदार डॉ शिवाजी काळगे याना भारतीय संविधानाचे पुस्तक व महात्मा गांधीजींचा

# ' आम्ही जरांगे ' मराठी चित्रपट शुक्रवारपासून प्रेक्षकांच्या भेटीला : डॉ. दत्ता मोरे



लातूर : मराठा आरक्षण आंदोलनाचे लढवय्ये नेतृत्व मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनकार्यावर आधारित ' आम्ही जरांगे ' गरजवंत मराठ्यांचा लढा हा मराठी चित्रपट येत्या शुक्रवारपासून, दि. २१ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकारांच्या भूमिकांनी नटलेला हा चित्रपट रसिक प्रेक्षकांच्या पसंतीस नक्की उतरेल, असा विश्वास या चित्रपटाचे निर्माते डॉ. दत्ता मोरे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. ' आम्ही जरांगे ' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या अनुषंगाने चित्रपटातील कलाकारांसह निर्माते डॉ. दत्ता मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठवाड्यातील प्रमुख शहरात या चित्रपटाचा मुख्य उद्देश समाजासमोर आणण्यासाठी प्रसार माध्यमांशी संपर्क साधून सुसंवाद केला. यावेळी निर्माते डॉ. दत्ता मोरे, डॉ. मधुसुदन मगर यांच्यासह मराठा समन्वयक श्याम वडजे, पडद्यावर जरांगे पाटील यांची भूमिका साकारणारे पृथ्वीराज थोरात, पुरूषोत्तम माने, लातूरचे डॉ. अभय कदम, विजय घाडगे, भगवान माकणे, विजय औंढे, वैजनाथ जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांचे बालपण, तरुणपण आणि मराठा आंदोलन या तीन भूमिका सक्षमपणे पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सांगून डॉ. दत्ता मोरे म्हणाले की, या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आम्ही ज्या – ज्या ठिकाणी गेलो, त्या– त्या ठिकाणी रसिक प्रेक्षक जरांगे पाटील यांच्यावर जीव ओवाळून टाकताना आढळून आले. जरांगे पाटील यांचा संपूर्ण अभ्यास करुन पृथ्वीराज थोरातसह तिन्ही कलाकारांनी त्यांचे वास्तव जीवन, मराठा आंदोलनाचा संघर्ष पडद्यावर साकारल्याचे त्यांनी सांगितले. छावा मराठा संघटनेचे नेते लातूरचे स्व. आण्णासाहेब जावळे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पहिला आरक्षण धडक मोर्चा काढला होता. लातूरकरांना आरक्षणाचा संपूर्ण इतिहास ज्ञात आहे. त्यामुळे लातूरकर या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद देतील. लातूरकर आण्णांना व जरांगे पाटलांना नक्कीच साथ देतील ,असा विश्वासही डॉ. मोरे यांनी व्यक्त केला. ह्या चित्रपटात राजकारण नसून समाजकारण आहे. हा चित्रपट तरूणांसाठी आहे. आपल्या उद्दीष्टांसाठी जगायचे, लढायचे. मरायचे नाही, हा चित्रपटाच्या निर्मितीमागचा मुख्य उद्देश्य असल्याचेही डॉ. मोरे यांनी सांगितले.

जरांगे पाटलांची भूमिका वठविणाऱ्या पृथ्वीराज थोरात यांनी यावेळी बोलताना आपणास सुरुवातीला थोडे दडपण आल्याची कबुली दिली. पण नंतर जरांगे पाटील यांचे व्हिडीओ पाहून आपण स्वतःला तयार केले. ही उर्जा आपणास छ. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने मिळाली. मनोज जरांगे पाटील यांचे विचार घराघरात पोहचविण्याचा प्रयत्न आम्ही सर्वांनी या चित्रपटाच्या माध्यमातून केला आहे. हा चित्रपट पाहून तरुण आत्महत्या करणार नाहीत तर संघर्ष करून लढवय्ये बनतील, असा विश्वासही थोरात यांनी व्यक्त केला. या चित्रपटात मकरंद देशपांडे, प्रसाद ओक, सुबोध भावे, अजय पुरकर, कमलेश सावंत, विजय निकम यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

# संविधानाचा सन्मान करून गृहप्रवेश



आरेगांव ता. मेहकर: येथील अंजुर भोसले यांनी अथक परिश्रमातून बांधलेल्या घरामध्ये संविधानाचा सन्मानवस्विकारकरूनगृहप्रवेशकेला.

शिक्षण हे जागृती निर्माण करत असते याचे उदाहरण म्हणजे अंजुर भोसले. अंजुर भोसले हे आरेगांव येथील आदिवासी समाजातील एकमेव सुशिक्षित व्यक्तीमत्व. आपल्या शिक्षणाच्या जोरावर नोकरी मिळवून आज पर्यंत चांगली कामगिरी बजावून पदोन्नती सुद्धा मिळवलेली आहे. आदिवासी समाज व्यसनाधीन व गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये अग्रेसर असून लहानपणापासून अंजुर भोसले हे या पासून अलिप्त राहीलेले आहेत. नोकरी करतात माणसाशी माणसा प्रमाणे राहून माणसाचा सन्मान करणारे, व माणसाला माणूस म्हणून ओळख निर्माण करून मानसाचा खऱ्या अर्थाने सन्मान करणारे व सर्वांना समान संधी निर्माण करणारे संविधान याबद्दल प्रचंड आदर व सन्मान यांच्या कडे आहे. संविधानामुळेच माणसाचे अस्तित्व आहे. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी संविधान एकमेव मार्ग आहे आणि संविधाना शिवाय आपले काहीच अस्तित्व शिल्लक नाही याच जाणिवेतून त्यांनी गृहप्रवेश करताना अगोदर संविधानाच्या प्रती आदर व्यक्त केला. शिक्षणामुळे परिवर्तन होत याचे हे उत्कृष्ट उदाहरण होय. देशातील प्रत्येक नागरिकांचा व देशाचा विकास करणारे संविधान घराघरात असायला पाहिजे, फक्त संविधान घरात असुन चालणार नाही तर ते समजून घेण्यासाठी नियमित पणे वाचले पाहिजे हि अपेक्षा व्यक्त करून अंजुर भोसले यांनी गृहप्रवेशाच्या वेळी संविधानाची नवीन प्रत आणली. गावातील आदिवासी समाज आजही शिक्षण, व विकासापासून दुर असताना अंजुर भोसले यांनी स्वतः च्या मुलींना शिक्षणासाठी घराबाहेर ठेवून पुन्हा एक नवीन आदर्श समाजा समोर ठेवला आहे. अंजुर भोसले व त्यांची पत्नी यांचे कौतुक सर्वच स्तरावर होत आहे. संविधानाला अभिवादन करून गृहप्रवेश करणारे अंजुर भोसले हे पंचक्रोशीतील एकमेव व्यक्तीमत्व असल्याने त्यांच्या या परिवर्तनाची दखल अनेकांनी घेतली आहे. गृहप्रवेशाच्या वेळी त्यांचे प्रशासकीय कर्मचारी अधिकारी, मित्र मंडळी, गावातील सर्व हितचिंतक या मंगलमय कार्यक्रमाला उपस्थित होते.

# शेतीच्या यांत्रिकीकरणाने शेतकरी बैलजोडी पासून दुरावला





किनवट/शेख शौकत :–ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शेतीची मशागत शेतकरी बैलजोडीच्या माध्यमातून करीत आला आहे. परंतु, अलिकडे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण वाढू लागले आहे. त्यातच विभक्त कुटुंबद्ध कुटुंब पद्धती वाढत असल्याने बैल जोडी पाळणे एकलपायी शेतकऱ्यांना जिकरीचे होत आहे. बैल जोडी असल्यास नेहमी चारापाणी करण्यासाठी एक माणूस गुंतून असतो त्यामुळे शेतकऱ्यांना बैल जोडी न ठेवताच काही यांत्रिक मशीनने न होणारी कामे बैल जोडी मागामागी किंवा मजुरेंनी लावून शेतीची कामे करून घेत आहेत. त्यामुळे बैलजोडी पाळण्याकडे शेतकऱ्यांचा कल कमी होऊ लागला आहे. त्यातच बैल खरेदीचा लाखाच्या घरात गेलेला आकडा आणि बैलांच्या संगोपनाचा खर्च हाताबाहेर गेल्याने टॅक्टरच्या माध्यमातून शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे कृषी प्रधान देशात यांत्रिकीकरण वाढल्याने बैलजोडी मशागत कालबाह्य होऊ लागली आहे. खरीप व रब्बी हंगामातील शेतीची मशागत व नांगरणी बैलजोडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केली जाते. पण सध्याच्या परिस्थितीत निसर्गाच्या अवकृपाने शेतकऱ्याला मोठ्या प्रमणात नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. उत्पन्न कमी व खर्च जास्त येत असल्याने शेतकऱ्याला बैलजोडी, चारा, मजुरी यांचा खर्च परवडत नाही. त्यामुळे ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा अधिक भर आहे. तसेच शासनाकडूनही विविध सबसिडीच्या माध्यमातून ट्रॅक्टर व मशागत आणि पेरणीचे लहान मोठे यंत्र उपलब्ध होत आहे. जवळपास १० एकर क्षेत्र असलेले शेतकरी बैल जोडी सह ट्रॅक्टर व यंत्राचा वापर करत असल्याने ठराविक शेतकऱ्यांकडेच बैलजोडी मिळत आहे. कमी वेळात शेतीची कामे होत असल्याने आता बैलजोड्या तुरळक प्रमाणात दिसत आहेत. यांत्रिकीकरणाने शेतीची मशागत सोपी झाली खरी, परंतु महागाईमुळे यंत्रांच्या किमती वाढल्या. त्याला लागणारे डिझेल, पेट्रोलचे दर शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. त्यातच शेतीचा वाढता खर्च, अवकाळी पाऊस, शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडलेले अनेक ठिकाणी बघावयास मिळत आहे.

# १० वर्षांपासून लातूर तहसीलमध्ये तळ ठोकणारे तलाठी व मंडल अधिकारी यांच्या इतर तालुक्यात बदल्या करा

## – तलाठ्यांच्या बदल्याचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांकडे

लातूर – लातूर तहसील कार्यालय अंतर्गत अनेक तलाठी व मंडल अधिकारी १० वर्षांपासून तळ ठोकून आहेत. त्यांच्या इतरत्र झालेल्या बदल्यात वशिलेबाजी करून रद्द करून घेतल्या जात आहेत. त्यामुळे तलाठी व मंडल अधिकाऱ्यांची लातुरात मक्तेदारी सुरु झालेली आहे. वशिलेबाजी व चिरिमिरी देऊन सगळे तलाठी व मंडल अधिकारी लातूरलाच येऊ इच्छित आहेत. इतर तालुक्यात कोण्या तलाठी किंवा मंडल अधिकाऱ्याची बदली इतर तालुक्यात झाली तर वशिलेबाजीने ती रद्द करून घेतली जात आहे. मुलांचे शिक्षण व इतर सोयी सुविधाचा विचार सगळेच तलाठी व मंडल अधिकारी लातुरात बदली राहावी यासाठी प्रयत्न करत असतानाचे चित्र दिसून येते आहे.शासकीय जीआर प्रमाने सर्व तलाठी वर्गाच्या बदल्या झाल्या पाहिजेत पण तसें होताना दिसत नाही.लातूर तालुक्यामध्ये ज्या तलाठ्यांचे १० वर्षे झाले आहेत अजून पण मुदतवाढ मागत आहेत त्यांच्या बदल्या तालुका बाहेर झाल्या पाहिजे, कारण शेतकरी व नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागतील.विशेष म्हणजे आतापर्यंत तलाठी व मंडल अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार उपविभागीय अधिकाऱ्याकडे होते मात्र आता नव्या जीआर प्रमाणे या बदल्यांचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे असणार आहेत. त्यामुळे तलाठी व मंडल अधिकारी यांच्या बदल्यांमध्ये वशिलेबाजी होणार नाही. अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

# आज लातूर जिल्हा पोलीस शिपाई, पोलीस शिपाई (बॅण्डस्मॅन) व पोलीस शिपाई चालक भरती



लातूर :– आज लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची (३९), पोलीस शिपाई (बॅण्डस्मॅन) यांची (०५) व पोलीस शिपाई चालक यांची (२०) अशा एकुण (६४) पदाची भरती २०२२–२०२३ करिता दिनांक ०१.०३.२०२४ रोजी स्थानिक वृत्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच लातूर जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ वरती प्रसिद्ध करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने महाआयटी यांचे मार्फत पोलीस भरती सन २०२२–२०२३ चे अनुषंगाने दि.०५.०३.२०२४ ते दि.१५.०४.२०२४ या कालावधीमध्ये उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरावयाची सुविधा या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती. लातूर जिल्हा पोलीस शिपाई, पोलीस शिपाई (बॅण्डस्मॅन) व पोलीस शिपाई चालक भरती २०२२–२०२३ ची जाहिरातीमध्ये नमुद प्रमाणे प्रवर्गनिहाय एकुण (६४) रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेची कागदपत्रे पडताळणी, शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी ही दिनांक १९.०६.२०२४ रोजी सकाळी ०५.०० वाजता पासून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे होणार आहे. संबंधीत उमेदवारांना महाआयटी यांचेकडुन प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहेत. सदर प्रवेशपत्रावर उमेदवारांना पोलीस भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणी, शारिरीक मोजमाप व शारिरीक चाचणीस कोणत्या तारखेस हजर रहावयाचे आहे याबाबतची माहिती देण्यात येणार आहे. त्यानुसार उमेदवारांना प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या तारखेस पोलीस मुख्यालय, लातूर येथे पोलीस भरती प्रक्रियेसाठी हजर रहायचे आहे. उमेदवार दिलेल्या तारखेस पोलीस भरतीच्या कागदपत्र पडताळणी व शारिरीक चाचणीस उपस्थित न राहिल्यास त्यांना नंतर संधी देण्यात येणार नाही. परंतु जर पावसामुळे एखादे दिवशी मैदानी चाचणी होवू शकली नाही तर त्यांना पुढची सुयोग्य तारीख दिली जाणार आहे. काही उमेदवारांना वेगवेगळ्या पदांकरिता एकापेक्षा जास्त ठिकाणी एकाच दिवशी मैदानी चाचणी करिता हजर राहण्याची सुचना प्राप्त झाली असेल अश्या उमेदवारांना दुसरी तारीख दिली जाणार आहे. मात्र या करिता उमेदवार पहिल्या मैदाणी चाचणीस हजर होता याचे लेखी पुरावे दुसऱ्या मैदानी चाचणी वेळी सादर करावे लागतील. उमेदवारांनी त्यांना अशी दुसरी तारीख मिळणेसाठीचा विनंती अर्ज या कार्यालयाचे संकेतस्थळावर अथवा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे सादर करावयाचा आहे. उमेदवारांना अडचण / शंका असल्यास त्यांनी या वर ई–मेल करावा. तसेच काही उमेदवारांना इतर अडचणी असल्यास त्याचे निरसन स्थानिक पातळीवर केले जाईल. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी, शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी करिता सोबत आणावयाचे साहित्य, कागदपत्राची माहिती तसेच सुचना याबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ वरती उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच लातूर जिल्हा पोलीस शिपाई, पोलीस शिपाई (बॅण्डस्मॅन) व पोलीस शिपाई चालक भरती–२०२२–२०२३ प्रक्रियेमध्ये उमेदवारांचा काही आक्षेप किंवा तक्रार असल्यास त्यांनी दुरध्वनी क्रमांक ०२३८२–२४२२९६ वरती तसेच या कार्यालयाचे ई–मेल आयडी वर सविस्तर आक्षेप नोंदविण्यात यावा. अशी माहिती लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# जेजेमध्ये कला, डिझाईन, आर्किटेक्चरवर पाच नवे अभ्यासक्रम

मुंबई–कला, डिझाईन, आर्किटेक्चर क्षेत्रातील व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन या विषयात अधिक स्पेशलाईज्ड असे पाच नवीन अभ्यासक्रम स्वायत्त दर्जा मिळालेल्या सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर ॲण्ड डिझाईनतर्फे सुरू करण्यात येणार आहेत.

यात मेट्रोपोलिटीन आर्किटेक्चर, टायपोग्राफी आणि टायपो डिझाईन, कम्युनिकेशन ॲण्ड एक्पिरिअन्स डिझाईन, आर्किटेक्चरल एज्युकेशन, डिझाईन एज्युकेशन अशा काही विषयांचा समावेश आहे. यात पदवी–पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम यंदापासून सुरू केले जातील, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रजनीश कामत यांनी दिली.जेजे स्कुल ऑफ आर्ट अशी ओळख असलेली ही संस्था १८५७ पासून अस्तित्त्वात आहे. या संस्थेला या शैक्षणिक वर्षापासून डि नोव्हा (स्वायत्ततेचा एक प्रकार) दर्जा देण्यात आला आहे.सध्या संस्थेच्या प्रांगणात कला, आर्किटेक्चर, अप्लाईड आर्टवरील अभ्यासक्रम राबविले जात आहेत. संस्थेचे जुने अभ्यासक्रम सुरू राहणार आहेत. केवळ राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार त्यांच्या स्वरूपात बदल केला जाईल.

# राजर्षी शाहू महाराज जयंती समिती च्या अध्यक्ष पदी प्रा माधव गादेकर तर कार्याध्यक्षपदी राजकुमार होळीकर यांची निवड

लातूर :– सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराजांच्या १५०व्या जयंती व्यापक प्रमाणात साजरी करण्या साठी फुले शाहू आंबेडकर विचार मंच च्या सदस्यांची नुकतीच एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जयंती समिती च्या अध्यक्ष पदी प्रा माधव गादेकर व कार्याध्यक्ष पदी राजकुमार होळीकर यांची निवड करण्यात आली. या निमित्ताने शालेय व महाविद्यालयीन स्तरावर निबंध लेखन वक्तृत्व स्पर्धा घेण्याचे ठरले. राजर्षी नी आरक्षणाचे धोरण स्वीकारलेल्या घटनेला १२२वर्ष पुर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने लातुरात आरक्षण परीषद आयोजित करण्याचे ठरले. या बैठकीस सुधीर अनवले, गणपत पाटील, भिसे सर, राजेंद्र कांबळे, तेलंगे सर, टि एस माने, बबन पवार, रामराव गवळी, विश्वंभर भोसले, प्रकाश घादगीने, रब्बानी शेख, माधव क्षीरसागर, संजय कुंटेवाडे, जितेंद्र सुर्यवंशी, संभाजी गायकवाड, आर डी गायकवाड, नुतन अंगरखे यांची उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE